
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बाल-वाङमय
दा. क्र. १०३२७





# आमची ओळख

१








म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. १०३९४ नों. दि
बा. वा.

# आमची ओळख

## भाग पहिला : प्राणी









अ नु क्र म


| | | |
|---|---|---|
| १ | गाय | १ |
| २ | बैल | ४ |
| ३ | म्हैस | ७ |
| ४ | रेडा | १० |
| ५ | शेळी | १३ |
| ६ | मेंढी | १६ |
| ७ | घोडा | १९ |
| ८ | गाढव | २२ |
| ९ | कुत्रा | २५ |
| १० | मांजर | २८ |
| ११ | उंट | ३१ |




आवृत्ति पहिली
जुलै १९६३

मूल्य रु. १=००

**प्रकाशक**
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
३८१ क, तपश्चर्या
शनवार, पुणें

**मुद्रक**
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव, पुणें २.



# १. गाय

माझे नाव गाय.

कपिला गाय या नावाने मला ओळखतात.

काळी कपिला गाय अधिक पवित्र मानतात.

डांगी, दिल्ली, सुरती, जाफराबादी, आदि जातीने मला ओळखतात.

मी जरी काळी असले तरी माझे दूध पांढरे असते. माझे दूध पचनास हलके असल्यामुळे, लहान मुलांना माझेच दूध देतात.

माझे तूपही औषधी आहे.

हिंदू लोक मला पवित्र मानतात.

मी हिंदूंचे आद्य दैवत आहे.

गुरुदेव दत्त, श्रीकृष्ण आदि देवांची माझ्यावर फार मर्जी.

त्यांच्याजवळ मी कायम असते.

माझा स्वभाव फारच गरीब आहे.

म्हणूनच तुम्ही एखाद्या भोळ्या माणसास म्हणता,

" अल्लाकी गाय. "

आणखी एक म्हण तुम्ही नेहमीच वापरता.

कोणती बरे ?

" वासरात लंगडी गाय शहाणी. "

माझ्या शेणाचा व मूत्राचाही खतासाठी उपयोग होतो.

माझ्या हाडांपासून उत्तम प्रकारे खत मिळते. आणि चामड्यापासून तुम्हांस चपला मिळतात. मला जगाची माता समजतात.

मला प्रदक्षिणा करूनच गौतमऋषीने विजय


मिळविल्याची गोष्ट तुम्हांला मोठेपणी वाचावयास मिळेलच.

मग आता पटलीना माझी ओळख ?

बरे, येते.

हम्मा ऽ हम्मा ऽ ऽ

---



# २. बैल

माझें नांव बैल.

ढवळ्या - पवळ्या, हिरा - मोती, आदि नांवाने मला ओळखतात.

डांगी, खिलारी, सुरती, दिल्ली आदि जाती माझ्याच आहेत.

मी शेतकऱ्याचा खराखुरा मित्र आहे. शेत नांगरणे, मोट ओढणे, गाडी ओढणे, रहाट ओढणे, इत्यादि कामे

मलाच करावी लागतात.

खेडेगावात प्रवास करण्यासाठी मलाच गाडीला जोडतात.

मी जर शेतकऱ्याबरोबर मेहनतीने शेतात काम केले नाही, तर तुम्हांला धान्य तरी कोठून मिळेल ?

हिंदू लोकांचा मुख्य देव जो शंकर, त्याचे वाहन जो नंदी तो मीच.

माझ्या पराक्रमाची कथा " काशीखंड " या ग्रंथात वाचा.

शंकराच्या देवळापुढे माझेच निवासस्थान.

तुम्ही ज्या वेळी शंकराच्या देवळात येता, त्या वेळी तुम्हांला प्रथम माझेच दर्शन घ्यावे लागते.

शंकर-पार्वतीच्या सोंगट्यांच्या खेळात, मी शंकराच्या बाजूने खोटे बोललो म्हणून पार्वतीने मला शाप दिला.

आणि पृथ्वीवर पाठविले.

तेव्हापासूनच माझ्या मानेवर " जू " बसले.

तुम्ही नेहमी एक म्हण म्हणता-

कोणती बरे ?

" अति शहाणा त्याचा बैल रिकामा. "


माझा सारा देह मानवाच्या सत्कार्यासाठीच खर्च केला जात आहे.

मग आता पटलीना माझी ओळख ?

बरे, येतो.

( डरकाळून जातो. )

---



# ३. म्हैस

माझे नाव म्हैस.

माझी शिंगे जरी मोठी असली, तरी ती मला जड वाटत नाहीत.

म्हणूनच तुम्ही म्हण म्हणता–

" म्हशीची शिंगे म्हशीला जड नसतात. "

माझे दूध जरी पचनास जड असले, तरी पौष्टिक असते.

माझे तूपही शक्तिवर्धक आहे.

जाफराबादी, सुरती, दिल्ली, काठेवाडी, मेहसाणी इत्यादि माझ्या जाती आहेत.

मी दूध फार देते म्हणून माझी किंमतही फार असते.

साऱ्या जगाला बहुतेक माझ्या दुधाचाच पुरवठा करावा लागतो.

मुंबईतील जनतेला मुबलक दूध मिळावे म्हणून सरकारने गोरेगावनजिक आरे कॉलनीत अनेक जातीच्या म्हैशी आणून भरपूर दूध मिळेल अशी व्यवस्था केली आहे.

आणंद, पालघर, पुणे, इत्यादि ठिकाणी असलेल्या डेअऱ्यातूनही भरपूर प्रमाणात दूधपुरवठा करण्यात येत आहे.

एखाद्या देवाचे वाहन बनण्याचे माझ्या नशिबी नाही.

पण शेतकऱ्याला सुखी करण्यासाठी मला सदैव जागृत राहावे लागते.

माझ्या हाडांचा खतासाठी उपयोग करतात.

शेणाचा शेणखतासाठी उपयोग करतात.

माझ्या शेणापासून तयार होणाऱ्या शेणखतामुळे उत्तम प्रकारची पिके शेतकऱ्याला घेता येतात.

तुम्ही चपला, बूट आणि कमरपट्टे वापरता ते माझ्याच कातड्याचे बनविलेले असतात.


तुमच्या उपयोगासाठीच माझा देह आहे.

मग आता पटली ना माझी ओळख?

बरे, येते.

राज्य ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

---



# ४. रेडा

माझे नाव रेडा.

म्हशीप्रमाणे माझीही शिंगे मोठी असतात. माझा रंग काळा, पण माझे काम काळासारखे. शेतकऱ्याला शेतीच्या कामास मीच मदत करतो.

विशेषतः कोकणात भातशेतीची लागवड करण्यासाठी जमिनीत चिखल करावा लागतो.

हा चिखल करण्यास मीच सबंध दिवस चिखलात नांगर ओढतो.

रहाट ओढणे, गाडी ओढणे, इत्यादि कामे बैला-प्रमाणे मलाही करावी लागतात.

उन्हाळ्याच्या दिवसापेक्षा मला पावसाळ्याचे दिवस फार आवडतात.

पावसात बसण्यास मला फार आनंद वाटतो.

महाराष्ट्राचे थोर संत ज्ञानेश्वर यांनी आपल्या पवित्र ज्ञानाची साक्ष माझ्या मुखांतूनच वदविली.

देवदरबारी मला जो मान मिळाला आहे तो ‘यम’-राजाच्या पदरी !

यमाला मी पाठीवर बसवून लोकांचे जीव हिरावून घेण्यासाठी भू-लोकावर आणतो.

या वेळी मला फार दुःख होते. पण करणार काय, आपल्यावर सोपविलेली कामगिरी पार पाडणे हे आपले कर्तव्य आहे.

माझ्या हाडांचा खतासाठी उपयोग होतो.

शेणाचा शेणखत म्हणून उपयोग होतो. कातड्याचा चपला, बूट बनविण्यासाठी उपयोग करतात.

सांगावयाचे एवढेच की–

मी जन्माला आल्यापासून मरेपर्यंत आणि मेल्या-नंतरही माझ्या मृत देहाचा उपयोग मानवासाठीच होतो.

मग आता पटलीना माझी ओळख ?

बरे, येतो.

---



# ५. शेळी

माझे नाव शेळी.

माझ्या सर्व अंगावर दाट केस आहेत. या केसांमुळे माश्या व डास यांपासून माझे रक्षण होते.

आणि माझ्या तोंडावरील सड पहा—

यांना " अजागळ स्तन " म्हणतात.

मी नेहमी काट्याकुट्यात चरते. काट्यात माझी मान कोठपर्यंत गेली आहे हे समजण्यासाठी याचा उपयोग होतो.

आमची मूळ वस्ती गवताळ प्रदेशात. पण अलिकडे सर्वच ठिकाणी मी तुम्हांस दिसेन.

माझ्या पायाचे हे खूर पाहा.

हे खूर जरी बारीक असले, तरी ते फार चिवट आहेत.

डोंगराच्या उंच कड्यावर मी बेधडक उड्या मारते.

मी नेहमी निरनिराळ्या वनस्पतींचा पाला खात असल्यामुळे माझे दूध औषधी बनले आहे. माझ्या दुधाचा औषधासाठीही उपयोग करतात.

मला पाळणे सोपे असल्यामुळे गरीब लोकसुद्धा मला पाळतात.

म्हणूनच मला ' गरिबाची गाय ' असेही म्हणतात.

माझ्याविषयी तुम्ही नेहमी एक म्हण म्हणता–

कोणती बरे ?

" शेळी जाते जिवानिशी, आणि खाणारा म्हणतो वातड. "

काही लोक माझे मांस आवडीने खातात. माझ्या कातडीचा उपयोग वाद्य करण्याकरिता करतात.

ताशा, ढोलकी, इत्यादि वाद्ये माझ्याच कातड्याची. जिवंतपणी तर मी मानवाच्या उपयोगी पडतेच, पण मृत्यू-नंतरही लोक माझ्या कातड्याची वाद्ये बनवून आनंद साजरा करतात.

आता पटली ना माझी ओळख ?

बरे, येते.

बॅंऽ बॅंऽऽ बॅंऽऽऽ

---



# ६. मेंढी

माझे नाव मेंढी.

माझ्या अंगावर दाट केस आहेत.

थंडी-वाऱ्यापासून रक्षण करण्यासाठी या केसांचा मला उपयोग होतो.

उन्हाळ्यात माझ्या अंगावरील केस कापतात.

त्याला ' लोकर ' असे म्हणतात.

लोकरीपासून गरम कपडे तयार करतात.

थंड प्रदेशातील लोक हिवाळ्यात जे गरम कपडे

वापरतात ते माझ्याच केसांचे.

माझे दूधही धनगर लोक पितात.

माझ्या दुधापासून जे तूप तयार होते, ते फार औषधी असते.

गवत व झाडाझुडपांचा पाला हेच माझे अन्न.

मानवाच्या भविष्याच्या बारा राशी आहेत. त्यात मला स्थान आहेच.

" मेष " रास हे माझ्याच नावाचे प्रतीक.

दक्ष राजाच्या यज्ञात, पार्वतीने उडी घेतली. तेव्हा शंकरास भयंकर क्रोध आला आणि वीरभद्राकरवी त्याने दक्षाचे शीर उडविले.

पुढे दक्षाला जिवंत करण्यात आले. त्याला माझ्याच भावाचे डोके बसविले.

शरीर माणसाचे पण शीर मेषाचें.

माझे मांस काही लोक खातात.

माझ्या कातडीचा उपयोग वाद्ये बनविण्यास होतो.


माझी बुद्धी मंद आहे असे लोक म्हणतात.

पण जगात सर्वच प्राण्यांना जर सारखी बुद्धी दिली

तर जग चालणार कसे ?

इतर प्राण्यांप्रमाणे माझी ओळख काही जास्त नाही. पण तुम्ही सांगताच म्हणून माझी अल्प ओळख आपणास सांगितली; ती गोड मानून घ्या.

बरे, येते.



# ७. घोडा

माझे नाव घोडा.

युद्धकालात मीच राजेलोकांना उपयोगी पडतो.

पूर्वी मी आजच्यासारखा माणसाजवळ नव्हतो.

पण माणसाने मला फसवले आणि गुलाम बनविले. माझ्या तोडात लगाम घालून माणूस माझ्या पाठीवर बसू लागला.

माझी सारी शक्ति लगामाने आपल्या स्वाधीन घेतली.

माझा स्वाव चांगला असल्याचे तुम्हीच सांगता.

सिंहाच्या मानेवर आयाळ असते, तशी माझ्याही मानेवर आयाळ आहे.

मला गवत फार आवडते.

मूळचा मी गवताळ प्रदेशातलाच राहणारा. माझे शेपूट पहा कसे झुबकेदार आहे तें ! त्याचा उपयोग मला अंगावरील माश्या पळविण्यासाठी होतो.

माझ्या कातडीवर बारीक केस असून ते तेलकट असल्यामुळे पावसाचे पाणी माझ्या अंगावर रहात नाही.

माझ्या पायाचे खूर पहा.

गाईच्या पायांसारखे ते दुभागलेले नाहीत. पूर्वी लढाईसाठी माझाच फार उपयोग होत असे.

इतिहासकालात राणी लक्ष्मीबाई, शिवाजी, राणा प्रताप यांच्या घोड्यांची महती तुम्हांस माहीत आहेच.

कलंकी अवतार माझ्यावरच स्वार झाला आहे.

आज माझा उपयोग, टांगा ओढण्यासाठी करण्यात

आला आहे.


विश्रांतीसाठी मी कधीच बसत नाही. तीन पायांवर उभे राहणे हीच माझी विश्रांती. माणसाची सेवा करणे हाच माझा हेतू आहे.

मग आता पटली ना माझी ओळख ?

बरे, येतो.

खिंहीही ऽ खिंहीही ऽ ऽ

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रमांक
विभाग
क्रमांक
नों. दि.
शाखा



# ८. गाढव

माझे नाव गाढव.

घोडा माझा भाऊबंदच.

माझे कान फार लांब म्हणून तुम्ही मला हसता. माझी उंची जरी कमी असली तरी माझे कार्य मोठे आहे.

म्हणतात ना ?

" मूर्ती लहान पण कीर्ती फार. "

तुम्ही ज्या सडकेवरून मोटारीतून बसून मजेत प्रवास करता त्या सडका बांधण्यासाठी लागणारी माती व दगड माझ्याच पाठीवरून वाहण्यात आले.

उन्हा-तान्हात, थंडी-वाऱ्यात मी कामे केली म्हणूनच या सडका तयार झाल्या.

पावसात मात्र मला मनाजोगे काम करता येत नाही.

बेलदारलोक व कुंभारलोक हे माझे आश्रयदाते.

हे लोक माझ्याकडून भरपूर काम करून घेतात. पण त्या मानाने मला खावयास मात्र देत नाहीत.

संध्याकाळी मला मोकळे सोडल्यावर पोटाची भरती करण्यासाठी गावाच्या उकिरड्याचा मला आश्रय घ्यावा लागतो.

उकिरड्यावर पडलेली घाण खाऊन मी उकिरडे स्वच्छ करतो.

त्यामुळे मी तुमच्या आरोग्यासही चांगलाच हातभार लावतो.

पण त्यावर शिफारस काय ?

तर म्हणे-

" गाढवाला गुळाची चव काय ? "

पण कधी कधी तुम्हांस माझे पायही धरावे लागतात. म्हणूनच म्हण झाली आहे,

" अडला नारायण गाढवाचे पाय धरी. "


माझे दुसरे भाऊबंद आहेत त्याना खेचर म्हणतात.

आता पटलीना माझी ओळख ?

बरे, येतो.

हिंच्यां ऽ हिच्या ऽ ऽ हिच्या ऽ ऽ ऽ

---



# ९. कुत्रा

माझे नाव कुत्रा.

मी सर्व मानवांचा मित्र आहे.

विशेषतः सर्व शेतकरी व जंगलात राहणारे लोक मला आपल्या कुटुंबातील एक समजतात.

माझ्या अनेक जाती आहे.

मी माझ्या धन्याची सेवा इमानदारीने करतो. माझ्या

प्रामाणिकपणाचे पहिले बक्षिस गुरुदेव दत्तानीच मला दिले. आणि तेव्हापासून मी त्यांच्याजवळ कायम असतो.

माझ्या मालकाच्या घराचे रक्षण मी जागृकपणे करतो.

त्यासाठी मला जादा पगार वगैरे काही मिळत नाही बरे.

गुन्ह्याचा शोध मी आस्थापूर्वक करतो.

उन्हाळ्याच्या दिवसात मला फार त्रास होतो. माझ्या जिभेतून गळणाऱ्या घामावरूनच त्याची आपणांस कल्पना येईल.

मालकाशी बेइमानी करण्यासाठी दुसऱ्याने मला कितीही लालूच दाखविली तरी मी त्याला फसत नाही.

खाल्लेल्या शितांचे ( अन्नाचे कण ) हित करणे हेच माझे कर्तव्य.

माझ्याविषयी एक म्हण प्रचारात आहे. कोणती बरे ?

" कुत्र्याचे शेपूट नळीत घातले तरी ते वाकडेच. "

गरीब लोक जसे माझ्यावर प्रेम करतात. तसे श्रीमंत लोकही माझ्यावर प्रेम करतात.

शाहू महाराजांचे माझ्यावर किती प्रेम होते ते आपणास पुढे वाचावयास मिळेलच.

शाकाहारापेक्षा मांसाहार मला फार आवडतो. पण सर्वच ठिकाणी मला हा आहार करता येत नाही.


" ठेविले अनंते तैसेचि रहावे. "

पटलीना आता माझी ओळख ?

बरे, येतो.

भू – भू – भू

---



# १०. मांजर

माझे नाव मांजर.

माझे कापसासारखे मऊ व गुबगुबीत शरीर तुम्हांस फार आवडते.

तुमचे कपडे कुरतुडणाऱ्या व पदार्थ खाणाऱ्या उंदरांना मी खाऊन टाकते.

उंदरांचा त्रास होऊं नये म्हणून तुम्ही मला आवडीने पाळता.

हे माझे डोळे पहा.

यांत ही उभी चिर आहे ना ?

त्यामुळे मला रात्री चांगले दिसते.

माझे डोळे घारे असतात.

माझ्या पायांचे हे पंजे पहा—

किती मऊ आहेत !

आणि ही तीक्ष्ण नखे.

त्यांचा उपयोग मला झाडावर व भिंतीवर चढण्यासाठी होतो.

चालताना मी नखे आत ओढून घेते त्यामुळे चालताना माझ्या पायाचा आवाज होत नाही.

म्हणून मला शिकार करणे सुलभ होते.

मला एक फार वाईट खोड आहे.

ती म्हणजे चोरून खाण्याची.

काही खट्याळ सासवा आपल्या सुनेस "चोरटी मांजर" अशी उपमा देतात.

मला दूध फार आवडते.

शाकाहार व मांसाहार हेच माझे आहार !

बिरबलाने मात्र माझी चांगलीच खोड मोडली होती. ती गोष्ट तुम्ही "बिरबल आणि बादशहा" या पुस्तकात वाचली असेलच.

मला वाघाची मावशी असे म्हणतात.


मी जरी वाघाची मावशी असले तरी पाहुणी म्हणून त्याच्याकडे कधीही जात नाही बरे !

मग आता पटलीना माझी ओळख ?

बरे, येते.

म्याँव म्याँव म्याँव

---



# ११. उंट

माझे नाव उंट.

माझे शरीर अनेक ठिकाणी वाकडे असल्यामुळे तुम्ही मला हसाल.

पण त्याला माझा नाइलाज आहे. शरीर देणे हे देवाच्या हातात आहे. त्याला जसे आवडले तसे शरीर त्याने मला दिले.

माझे पाय लांब असून तळवे रुंद आहेत.

या रुंद तळव्यांचा मला वाळवंटांत चालण्यास फार उपयोग होतो.

उन्हाळ्यात ज्या वेळी रेती तापते त्या वेळी या मोठ्या तळव्यांच्या जोरावरच मी तापलेल्या रेतीवरून प्रवास करतो.

रेताड– प्रदेशातच माझा जन्म झाला.

समुद्रातून प्रवास करण्यास जसा जहाजाचा उपयोग होतो, तसाच वाळवंटातून प्रवास करण्यास माझा उपयोग होतो. म्हणूनच मला ( वाळवंटातील जहाज ) असे म्हणतात.

राजस्थान व सहारामध्ये पाऊस कमी पडतो. त्या ठिकाणी खजूर फार होतो. तो खजूर माझ्या पाठी-वरूनच मी तुमच्यासाठी आणतो.

युद्धकालात तोफा ओढण्याचे मी काम करीत असे. काही लढवय्ये माझ्यावर बसून लढाई करीत. त्यांना " सांडणी-स्वार " असे म्हणत.

मला पाणी फार लागते. पण हे पाणी मला रोज

प्यावयास मिळत नाही. एक दिवस पाणी प्यालो म्हणजे सात-आठ दिवस मला पाणी पिण्याची आवश्यकता भासत नाही.

प्रवासकालात जर पाणी संपले तर अरब लोक मला कापतात व माझ्या पोटातील पाणी पितात. आणि माझे मांसही खातात.

पालापाचोळा हे माझे अन्न. माझ्या ह्या लांब माने-मुळे मला उंचावरीलही पालापाचोळा खाता येतो.

" उंटावरून शेळ्या हाकणे " ही म्हण तुम्हांला माहीत असेलच.

पटलीना माझी ओळख ?

बरे, येतो.

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 3५३५६
विभाग
क्रमांक
नों. दि.
शाखा

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ........ नों. दि ........
वि. ........ क्र. ........